ISSN 2231-1629
Knowledge Resonance

# छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य विषयक व आर्थीक विचार

**डॉ. कमलकिशोर वी. इंगोले**
आर.एस. बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट, जि. वर्धा

**प्रस्तावना**

छत्रपती शिवाजी महाराजांचा मृत्यू होऊन जवळपास 350 वर्षे उलटली तरीही त्यांच्या कार्य आणि कर्तृत्वाची आठवण झाल्याबरोबर महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाला अभिमान वाटतो. छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्याची महाराष्ट्रात पायाभरणी करून भारताला 'स्वराज्याचा' पहिला धडा दिला. छ.शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य आकाराने लहान असले तरीही ते संपूर्ण भारतामध्ये त्याकाळी स्वतंत्र आणि सार्वभौम होते. छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती करीत असताना स्वराज्याचे रूपांतर सुराज्यामध्ये करण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. म्हणून महाराष्ट्रातील अठरा पगड जातींच्या लोकांना हिन्दवी स्वराज्य हे आपलेच स्वराज्य वाटत होते. हिन्दवी स्वराज्याच्या जडण-घडणीसाठी बारा बलुतेदार, अठरा अलुतेदार, गावकुसातील आणि गावकुसाबाहेरील प्रत्येकांनी आपले सर्वस्व छ.शिवाजी महाराजांच्या पाठीशी उभे केले. त्यामुळेच शिवाजी महाराजांच्या हयातीमध्ये हिन्दवी स्वराज्यात कधीही धार्मिक दंगल अथवा बंडखोरी झालेली दिसत नाही. धार्मिक आणि सामाजिक सलोखा हे छ. शिवाजी महाराजांच्या हिन्दवी स्वराज्याचे फार मोठे वैशिष्ट्ये होते. आधुनिक काळातील धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक समायोजन या दोन तत्वांना छ.शिवाजी महाराजांनी आपल्या प्रशासकीय धोरणाचा पाया ठरवून त्यावर हिन्दवी स्वराज्याची उभारणी केलेली होती. म्हणूनच छ.शिवाजी महाराजांचे सामाजिक धोरण अभ्यासणे अत्यंत महत्वाचे ठरणारे आहे.

महाराष्ट्राची भूमी ही उज्ज्वल अशा ऐतिहासिक, सांस्कृतिक अणि सामाजिक परंपरा सांगणाऱ्या भूमीपुत्रांची खाण आहे. सह्याद्री सातपुडयांच्या रांगांनी, पवित्र अशा महानद्यांनी आणि दुर्गम अशा गडकोटांनी बनलेल्या महाराष्ट्रातील लोकांच्या अंगी कर्तृत्व, धैर्य, शौर्य अणि शांती सहज दिसून येते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत एकनाथ, संत नामदेव, संत चोखोबा, संत जनाबाई अगदी अलीकडच्या काळात संत गाडगे महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अशा अनेक संतानी महाराष्ट्राच्या आध्यात्मिक संस्कृतीची जडणघडण केली आहे. मराठी भाषा, महाराष्ट्राची माती, पाणी, माणूस, त्यांचे भावविश्व, आणि महाराष्ट्राची अस्मिता यांचे वर्णन विविध कवींनी केले आहे, कविवर्य गोविंदाग्रज हे यर्थातेने महाराष्ट्राचे वर्णन करतांना म्हणतात, राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा। नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याही देशा ।।अंजन कांचन करवंदीच्या काटेरी देशा भावभक्तीच्या देशा, आणिक बुध्दीच्या देशा । शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा ।। हिंदवी स्वराज्य संस्थापक, रयतेचा राजा, लोककल्याणकारी राजा श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अतुलनीय पराक्रमाने ही महाराष्ट्राची पावनभूमी पवित्र झाली आहे. सुमारे तीनशे शतकांच्या परचक्राच्या प्रदीर्घ अंधाऱ्या रात्रीनंतर महाराष्ट्राच्या भूमीवर स्वराज्याचा उषःकाल झाला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या रूपाने रयतेचा राजा महाराष्ट्र भूमीला मिळाला. दूर दृष्टी, असीम धैर्य, परिस्थितीचे अचूक मूल्यमापन, प्रबल इच्छाशक्ती, मुत्सुध्दी, रयतेवर जिवापाड प्रेम करणारा राजा अशा विविध गुणांनी परिपूर्ण छत्रपती शिवरायांनी 'प्रतिपचंद्ररेखेव वर्धिष्णू' अशा स्वराज्याची स्थापना केली. आपल्या प्रभावी व्यक्तिमत्वाच्या जोरावर आणि

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

योजनाबध्द अविरत श्रमाने त्यांनी राजकीयदृष्ट्या स्वतंत्र राज्य निर्माण करण्यासाठी जनतेमध्ये देशभक्तीची भावना निर्माण केली . कौशल्य, चातुर्य अणि साहस या गुणांनी त्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक शक्ती स्वराज्य स्थापण्यासाठी एकत्रित केल्या त्यामुळे ते आपल्या काळातील युगप्रवर्तक ठरले. छत्रपती शिवाजी महाराजांचे चारीर्त्य साधेपणा, कनवाळूपणा, स्त्रियांबद्दल असणारा भक्तीभाव, त्यांची धार्मिक वृत्ती यामुळे महाराष्ट्राच्या तळागाळातील जनतेमध्ये महाराज अवतारी पुरुष असल्याची भावना निर्माण झाली होती कारण महाराजासारखा धर्मनिरेपक्ष राजा या देशात झालाच नाही. शिवाजी महाराजांनी शासनात शिस्तबध्दता निर्माण केली, न्यायदानात निःस्पृहता दाखविली. गैरकारभार करणाऱ्या अधिकाऱ्यांना मुलाहिजा न ठेवता समज दिली, पश्चातापदग्ध होऊन परतलेल्या वतनदारांना अभयदान दिले. सर्व धर्मांना समान लेखले, गुणवंताचा गौरव केला, साधुसंताचा यथोचित आदर केला, परंतु या सर्वाबरोबरच त्यांनी आपला रयतेची जीवापाड काळजी घेतली. रयतेला आपल्या लेकराप्रमाणे मानणारे श्री शिवछत्रपती शिवाजी महाराज हे केवळ युगपुरुष नव्हते तर मानवतेचे उत्कृष्ट तत्वज्ञान सांगणारे आणि त्याप्रमाणे आचरण करणारे महात्मा होते, वंदनीय थोर पुरुष होते. महाराजांनी विविध कलांना प्रोत्साहन दिले, अनेकांना लेखनासाठी प्रेरणा मिळाली, राज्यव्यवहारात फारशीचे स्तोम होते त्यासाठी त्यांनी रघुनाथ पंडीत यांच्याकडून 'राज्य व्यवहार कोश' तयार करुन घेतला. 'शिवभारत' हा काव्यमय संस्कृत ग्रंथ नीलकंठ चतुर्धराची महाभारतावरील 'नीलकंठी' नावाची विस्तृत व मार्मिक टिका, भूषण आणि जयराम कवीचे काव्य असे विपुल ग्रंथ लेखन झाले. छत्रपती शिवाजी महाराज हे जसे दूर.ष्टीचे राज्यकर्ते होते तसेच अत्यंत सूक्ष्म दृष्टीने राज्यकारभार करणारे प्रजाहितदक्ष राजेही होते. 1673 मध्ये चिपळुणच्या सैन्याधिकारी यांना महाराजांनी लिहीलेले प्रत्र अत्यंत बोलके होते. 'मोगलाई बरी वाटेल, असे वागू नका' असे सांगतानाच 'उंदीर दिव्यातील वात नेईल आणि त्यामुळे आग लागण्याचा संभव आहे,' काफीखानासारखा इतिहास कारही महाराजांच्या उदारतेचे वर्णन करताना म्हणतो 'शिवाजीचे सैन्य परप्रांतात घुसल्याच्यावेळेही मशिदी, कुराण आणि स्त्रिया सुरक्षित राहिल्या.' 'सैन्याविना नैवराज्यं न धर्म पराक्रम' हे लष्कराचे वैविध्य शुकनीतीमधे सांगीतले आहेत. 'सैन्यावाचून राज्य धन अणि पराक्रम प्राप्त होत नाही' महाराजांनी आपल्या लष्कराची आणि आरमाराची उभारणी हे सुत्र डोळ्यासमोर ठेवूनच केली. रामचंद्रपंत अमात्य यांनी लिहिलेल्या 'आज्ञापत्र' आणि 'राजनिती' या ग्रंथांतून नूतन सृष्टी उभी केली गेली, छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीचे सर्व सार यांत एकटवले आहे. आपल्या मुलखात शांतता प्रस्थापित करणे, जनतेला निःपक्षपाती न्यायदान करणे, महसूल पध्दतीत सुसुत्रता आणणे, शेतकरी व शेतीला उत्तेजन देणे, आपल्या मुलखाचे रक्षण करण्यासाठी राष्ट्रीय सैन्यदल उभारणे, किनारपट्टीवर पहारा करण्यासाठी आणि व्यापारासाठी आरमार उभारणे अशी विविध प्रकारची छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यक्षम आणि कारभाराची वैशिष्टये होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याची सुव्यवस्थित घडी बसविण्यासाठी कर्तृत्व दाखविणाऱ्या अनेक व्यक्तींची निवड केली. स्वराज्यामागचे मुख्य सूत्र प्रजाहित असल्याने त्यांनी काटेकोर आणि कडक धोरण अवलंबले होते. त्यांनी सैन्यात शिस्त निर्माण केली. छत्रपती शिवाजी महाराजांना माणसांची अचूक पारख होती. त्यांचे अष्टप्रधान मंडळ, सहकारी, सेनाधिकारी अशी कितीतरी माणसे त्यांनी पारखुनच आपल्या जवळ केली होती. महाराजांनी सतत सज्जन व्यक्ती, आपले सेनानी, स्त्रिया, संत महंत यांचा सन्मान केला त्यांना सन्मानाची वागणूक देऊन राज्यव्यवस्थेत योग्य ते स्थानही दिले. छत्रपती शिवाजी महाराजांना आपल्याकडचे अपुरे सैन्यबळ, त्यांची क्षमता, दऱ्याखोऱ्या डोंगररांगाची भौगोलिक परिस्थिती, मर्यादित अशी लढाईची साधनसामुग्री, मर्यादित आर्थिक बळ ह्या गोष्टी

विचारात घेऊन महाराजांनी आपली स्वतंत्र युद्धनीती आखलेली होती. शक्यतो शत्रुला समोरासमोर सामने न जात, रक्ताचा एकही थेंब न सांगता त्यांनी अनेक गड किल्ले ताब्यात घेतले. छत्रपती शिवाजी महाराजांनी अनेक लढाया केल्या परंतु महाराजांच्या कारकिर्दीतील अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानाचा घेतलेला समाचार, पन्हाळगडाचा वेढा आणि आग्र्याहून सुटका हे कसोटीचे क्षण होते परंतु अशा प्रसंगावर धैर्याने मात करुन औरंगजेबासारख्या बलाढ्य सम्राटाला वठणीवर आणणारा शुरवीर म्हणून नाव लौकीक मिळविला. औरंगजेबासारखा मातब्बर सम्राटाला नामोहरम करत मुघलासहीत सर्व शत्रूंचा समाचार घेतल्यानंतर महाराजांनी आदिलशहा व कुतुबशहा यांनाही आपले वर्चस्व मान्य करण्यास भाग पडले. आपले राज्य आता निर्धोक झाले आहे असे वाटल्यानंतर महाराजांनी राज्याभिषेक करुन घेण्याचे ठरविले. एका बखरीमध्ये लिहिले आहे की 'महाराजांचा प्रताप दिवसेंदिवस वाढत चालला आहे. जाणोन सिंहासन करावे, राज्याभिषेक करावा असा सर्वांचा मनोदय झाला. किल्ले रायगडावर महाराजांचा राज्यभिषेक शास्त्रोक्त पद्धतीने मोठया दिमाखदारपणे संपन्न् झाला. राजमाता जिजाऊंच्या डोळयाचे पारणे फिटते मराठी जनतेला आपला राजा मिळाला एका लोककल्याणकारी राजाची कारकिर्द सुरु झाली म्हणून आसमंतात आनंदी आनंद झाला'. 'शिवरायांचे आठवावे रुप । शिवरायांचा आठवावा प्रतापगड महापराक्रमी छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन समर्थ रामदासांनी यथार्थ केले आहे. निश्चयाचा महामेरु । बहुत जनांसी आधारु । अखंड स्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी । या भूमंडळाचे ठायी । धर्म रक्षी ऐसा नाही । महाराष्ट्र धर्म राहिला काही । तुम्हाकरिता? इतिहासाचार्य राजवाडे छत्रपती शिवरायांचे गुणगान करतांना म्हणतात 'शिवाजीचे वर्तन न्यायाचे, नीतीचे, पराक्रमाचे, स्वधर्मपरायणाचे व परम सहिष्णुतेचे होते. अनेक लढायांत विजय संपादन करणे, मैदानात, समुद्र तीरावर किंवा डोंगरावर तीन चारशे किल्ले बांधणे, नवीन सैन्य तयार करणे, नवीन कायदे करणे, स्वभाषेस उत्तेजन देणे, कवींना आश्रय देणे, नवी शहरे बसविणे, स्वधर्म स्थापन करुन त्याचे ऐश्वर्य वाढविणे, सारांश स्वराष्ट्राचा उद्धार करुन स्वदेशाला स्वतंत्र व सुखी करणे, ह्या लोकोत्तर .त्यांनी जर कोण्या पुरुषाने ह्या भूमंडळाला अक्षय ऋणी करुन ठेवले असेल, तर ते शिवाजीनेच होय. शिवाजीची खाजगी वर्तणूक व सार्वजनिक पराक्रम इतके लोकोत्तर होते, की त्यांच्याशी तुलना करावयास जी जी म्हणून व्यक्तीघ्यावी ती ती ह्या नाही तर त्या गुणांने शिवाजीहून कमतरच दिसेल. ह्या अवतारी पुरुषाविषयी लिहिता लिहिता समर्थ म्हणतात, ' तयाचे गुणमहत्वासी तुलना कैसी ? यशवंत, कीर्तिवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, सुशील, धर्ममूर्ति, निश्चयाचा महामेरु, अखंड निर्धारी राजयोगी ' अशी नाना प्रकारची विशेषणे छत्रपती शिवाजी महाराजांना समर्थ रामदासांनी लाविली आहेत. युगपुरुष, लोकोत्तर जाणता राजा, प्रजाहितरक्ष लोकल्याणकारी राजाचे हे अरबी समुद्रातील स्मारक पुढच्या पिढ्यांना पराक्रमी महाराजांची व महाराष्ट्राची गौरवगाथा सांगत राहील.

**छ.शिवाजी महाराजांचे सामाजिक धोरण :-** छ.शिवाजी महाराजांच्या इतिहासाचे देशातील व देशाबाहेरील अनेक नामवंत इतिहासकारांनी, संशोधकांनी व अभ्यासकांनी खूप मोठ्या प्रमाणात संशोधन केलेले आहे. यात शंका नाही, परंतु झालेल्या संशोधनामध्ये नव्वद टक्के संशोधन हे राजकीय व प्रशासकीय क्षेत्राचेच झालेले आहे. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये छ. शिवाजी महाराजांच्या सामाजिक धोरणावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

**1) मुसलमानांचा उचित सन्मान -**

छ.शिवाजी महाराजांनी मात्र स्वराज्यातील परधर्मिय असलेल्या मुसलमानांना अत्यंत सन्मानाने वागवल्याचे दिसून येते. केळशी जि. रत्नागिरी येथील चाकूत बाबा ह्यांना छ.शिवाजी महाराज आपल्या गुरूस्थानी मानत

असत. त्यांनी चाकूत बाबाच्या दर्ग्यास उद, फुल, दिवाबत्ती आणि येथील फकिरांची सोय व्हावी म्हणून 653 एकर जमीन अग्रहार म्हणून दिल्याचा उल्लेख एका आज्ञापत्रात आढळतो. इ.स. 1652 मध्ये पेडगावच्या कुलकर्णी वतनाचा वाद निर्माण झाला तेव्हा बोलावण्यात आलेल्या न्यायसभेमध्ये सैय्यद महेमूद शेख इमामखान, समाखान मीर अलीखान आणि आगा अहमद हे चार मुसलमान सहभागी झालेले आहेत. वाद कुलकर्णी वतनाचा आणि पंच किंवा साक्षीदार म्हणून वरील चार मुसलामन आहेत. इ.स. 1650 मध्ये पाली येथील कुलकर्णी वतनाचा वाद निर्माण झाला. याही वादाच्या न्यायनिवाडाप्रसंगी आबूल रहिम मुलाना, इस्माईल देसाई, आब्दूलजी, हुसेनजी, अगामीर, महमद दलवी आणि इस्माईल अहमद यांच्या साक्षी प्रमाण मानुण त्यातदान करण्यात आले. इ.स. 1657 च्या गुंजन मावळच्या देशमुखी वतनांचा वाद निर्मान झाला तेंव्हा 72 वतनदार हजर हाते त्यात 10 मुसलमान वतनदार हजर आहेत. हया सर्व दाखल्यावरून छ. शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या जडण-घडणीत मुसलमानांना अत्यंत सन्मानाने सहभागी करून घेतले होते. या शिवाय सिद्यी हिलालखान, मदारी मेहत्तर, नूरखान बेग, इब्राहीमखान यांनी स्वराज्याच्या लष्करामध्ये फार मोठे शौर्य गाजवलेले सर्वांना ज्ञात आहेच. सिद्यी इब्राहिम हा मुसलमान तर छ.शिवाजीराजांचा विश्वासू अंगरक्षक म्हणून कार्यरत होता.एकीकडे मुसलमान राजकर्त्यांचे हिंन्दु विरोधी किंवा अडवणुकीचे धोरण आणि छ.शिवाजी महाराजांचे मुसलमानाप्रति अत्यंत जिव्हाळयाचे धोरण पाहिल्यानंतर छ. शिवाजीराजांच्या स्वराज्यात सामाजिक सलोखा का होता? या प्रश्नाचे उत्तर सापडते. छ. शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यभिषेका प्रसंगी रायगडावर जसे जगदिश्वराचे मंदिर उभारले तसेच त्यांनी आपल्या महालासमोरच मुसलमान बांधवासाठी मस्जिदीचेही बांधकाम करून सामाजिक सलोख्याचा आदर्श आपल्या समोर ठेवलेला आहे. छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील सामाजिक सलोख्यासाठी ''धर्म निरपेक्षता'' हया तत्वाचा आधार घेतल्याचे दिसून येते.

**2) जातिभेदाची तिव्रता कमी केली**

भारतीय समाजातून जी कधीच जात नाही तिला 'जात' म्हणतात. आधुनिक काळातील म.ज्योतिराव फूले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, गोपाळ गुरू हया समाजसुधारकांनी जाती अंतासाठी खुप मोठे कार्य केलेले आहे. यांच्या जातीअंताच्या भुमिकेतून छ.शिवाजी महाराजांकडे पाहता येणार नाही. कारण प्रत्येकाचे जीवन मुल्य वेगवेगळे असतात म्हणून एकमेकाच्या कार्याची तुलना करणे, न्यायोचित ठरत नाही. छ.शिवाजी महाराजांचे जीवन मूल्य स्वराज्याची उभारणी करून त्याचे सुराज्यात रूपातंर करणे, हे होते. त्यामुळे छ.शिवाजी महाराजाकडून जाति निर्मुलनाच्या कामाची आपेक्षा करता येणार नाही. तरीही छ.शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती करीत असताना त्यांनी महाराष्ट्रातील आठरा पगड जातीच्या मानसांना स्वराज्याच्या प्रवाहामये एकत्रित आणले. स्वराज्याच्या भगव्या झेंडयाखाली सर्वांना समानतेच्या न्यायाने वागवले, ही बाब त्यांच्या सामाजिक धोरणाचे अतिधष्ठान सांगण्यास पूरेशी आहे.

छ.शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीसाठी व उन्नतीसाठी महाराष्ट्रातील सर्व जातीच्या लोकांनी तनमनधन अर्पन केल्याचे इतिहासात असंख्य दाखले मिळतात. त्यात कान्होजी जेधे, तानाजी मालुसरे, येसाजी कंक, नेताजी पालकर, हंबीरराव मोहिते (मराठा), मोरोपंत पिंगळे आण्णजी दत्तो (ब्राम्हण), बाळाजी आवजी , बाजीप्रभू देशपांडे (कायस्थ), जिवा महाला, शिवाजी काशिद, तान महाळा (न्हावी), लाय पाटील (कोळी), नागनाक खंडू (महार), बहिर्जी नाईक (रामोशी), नूरबेग, काझी हैदर, मदारी मेहतर, दौलतखान, सिद्दी इब्राहिम, वाहवाखान, सुलतान खान आणि सिद्दी इब्राहिम (मुसलमान). हे सर्व छ.शिवाजी महाराजांचे स्वामीभक्त सेवक होते. या सार्वानी आपली

ISSN 2231-1629
Knowledge Resonance

ताकत छ.शिवाजी महाराजांच्या पाठीशी खंबीरपणे उभी केली, प्रसंगी आपल्या जीवाचे बलिदान दिले, म्हणूनच स्वराज्य निर्मितीचा संकल्प सिध्दीस गेला. ही आठरा पगड जातीची मानस एकत्रित करणे, हा सुध्दा छ.शिवाजी महाराजांच्या प्रगत सामाजिक धोरणाचा एक अविभाज्य घटक ठरतो. छ.शिवाजी महाराजांच्या अषा प्रकारच्या समाजिक धोरणामूळे तत्कालिन महाराष्ट्रातील जातीयतेची ताठरता किंवा तिव्रता काही प्रमाणात निश्चितच कमी झालेली दिसते.

**संदर्भ :**

1. *Balkrishna, Shivaji The Great, 4 Vols., Kolhapur. 1932.*
2. *Duff, James Grant, A History of Marhathas, 2 Vols., New Delhi, 1978.*
3. *Kincaid, Denis, The Grand Rebel, Bombay, 1937.*
4. *Kulkarni, G.T. Moghal-Maratha Relations, Poona, 1983.*
5. *Mahaley K. L. Shivaji The Pragmatist, Nagpur, 1969.*
6. *Mujumdar R. C. Ed. The Mughal Empire, Bombay, 1974.*
7. *Nadkarni, R. V. The Rise and Fall of the Maratha Empire, Bombay, 1966.*
8. *Pagadi, Setumadhavarao, Shivaji, Bombay, 1983.*
9. *Ranade, M. G. Rise of the Maratha Power and Other Essays, Bombay, 1961.*
10. *Rawlinson, H. G. Shivaji The Maratha : His Life and Times, Oxford, 1915.*
11. *Sarkar, J. N. House of Shivaji, Calcutta, 1955.*
12. *Sarkar, J. N. Shivaji and His Times, Calcutta, 1961*
13. *काटे, रा. गो. संपा. राजव्यवहारकोष, पुणे, 1956.*
14. *काळे, दि. वि. छत्रपति शिवाजी महाराज, पुणे, 1959.*
15. *कुरुंदकर, नरहर, संपा. छत्रपति शिवाजी महाराज जीवन रहस्य, पुणे, 1980.*
16. *गर्गे, स. मा. संपा. मराठी रियासत, खंड 1, पुणे, 1988.*
17. *ढेरे, रा. चिं. शिखर शिंगणापूरचा श्रीशंभूमहादेव, पुणे, 2001.*
18. *दिवेकर, स. म. संपा. कवींद्र परमानंद लिखित श्री शिवभारत, पुणे, 1927.*
19. *दीक्षित, मो. गं. संपा. छत्रपति शिवाजी महाराज जन्मतिथि निर्णय समिती अहवाल व निवेदने, मुंबई, 1968.*
20. *देशपांडे, प्र. न. छत्रपति शिवाजी महाराजांची पत्रे, धुळे, 1983.*
21. *पिसुर्लेकर, पां. स. पोर्तुगेज मराठे.संबंध, पुणे, 1967.*
22. *पुरंदरे, ब. मो. राजा शिवछत्रपति, पुणे, 1982.*
23. *बेंद्रे, वा. सी. श्री. छत्रपति शिवाजी महाराज, 2 खंड, मुंबई, 1972.*
24. *भावे, वा. .. युगप्रवर्तक शिवाजी महाराज, पुणे, 1955.*
25. *मेहेंदळे, गजानन भास्कर, श्री राजा शिवछत्रपति खंड 1, भाग 1.2, पुणे, 1996.*
26. *वाकसकर, वि. स. संपा. शिवछत्रपतींची 91 कलमी बखर, पुणे, 1930.*
27. *शहा. मु. ब. संपा. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे समग्र साहित्य, खंड 1 ते 13, धुळे, 1995.1998.*
28. *शेलवलकर, र्त्य. शं. श्री शिवछत्रपति : संकल्पित शिवचरित्राची प्रस्तावना, आराखडा व साधने, मुंबई, 1964.*